0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचेकडून दि.२९/१०/२०११ रोजी प्राप्त पत्र व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०११/जा.८६९, दि.०१/११/२०११, दि.१६/११/२०११, दि. ३०/११/२०११ व दि.१६/१२/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/ प्र.क्र.७४/२०११/जा.८७०, दि.०१/११/२०११.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दि.०९/११/२०११ रोजीचे टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदन.

५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे व्यवस्थापक योगेश शिंदे यांचे दि.२९/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

६) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे प्राधिकारपत्रधारक शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे दि.२९/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०११/जा. 23
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- 10 /02/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक १५/१०/२०११ रोजी नेरुळ पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री. बबन रेवजी इलग तसेच त्यांचे समवेत पोलिस हवालदार श्री. पावरा बक्कल क्र. ८३८ व पोलिस शिपाई श्री. इथापे बक्कल क्र. २४३६ हे गस्त करीत असतांना सुमारे पहाटे ५:२० वाजता त्यांना त्यांचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर यांनी समाधान चौका जवळील सार्वजनिक शौचालय, सेक्टर ४, नेरुळ येथे ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असल्याचे सांगून सदरच्या ट्रकमध्ये योगेश शिंदे यांच्या रेशन दुकानातील गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला आहे, अशी त्यांना बातमीदारामार्फम माहिती मिळालेली असल्याची सांगून सदर ठिकाणी पथकासह येण्यास सांगितले. त्यानुसार सदरचे पथक घटनास्थळी सुमारे पहाटे ५:३५ वाजता पोहचले असता, त्या ठिकाणी वरिष्ठ

पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर व पोलिस हवालदार श्री. नलगे हे हजर होते व त्या ठिकाणी ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असलेला दिसला.

सदरच्या ट्रकमधील मालासंदर्भात पथकाने खात्री केली असता, ट्रकमध्ये गोणीमध्ये गहू भरलेला दिसून आला. त्यासंदर्भात ट्रकमध्ये असलेले चालक नामे समाधान नामदेव खंडागळे तसेच ट्रकमधील दुसरा इसम नामे संतोष विश्वनाथ पवार (क्लिनर) यांचेकडे ट्रकमध्ये असलेल्या गहूबाबत माहिती घेतली असता, ट्रकमधील गहू हा योगेश शिंदे यांच्या रेशनिंग दुकानातील असून तो गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला असल्याचे उपस्थित दोन्ही इसमांनी सांगितले. त्यावरुन सदर पथकाने रेशनिंग दुकानदाराचा पत्ता विचारला व त्याच्या राहत असलेल्या घरी जाऊन त्यास घटनास्थळी घेऊन आले व सदर ट्रकमधील असलेल्या गव्हाच्या गोण्या संदर्भात विचारणा केली असता, रेशनिंग दुकानदार याने ट्रकमधील एकूण १९० गोणी गहू असल्याचे सांगून सदरचा गहू हा त्याच्या रेशनिंग दुकानातील असून बाजारात विक्रीसाठी त्याने ट्रकमध्ये भरलेला असल्याचे सांगितले. याबाबत पथकाने खात्री केली असता सदरचा साठा हा रेशनिंग दुकानदार योगेश शिंदे हे अनधिकृतपणे बाजारात गहू विक्रीसाठी घेऊन जात असल्याबाबत खात्री झाल्याने सदर रेशनिंग दुकानदार यांना सोबत घेऊन त्यांच्या स्वस्तिक कॉम्पलेक्स येथील रेशनिंग दुकान क्र. ४१ फ/४३२ या ठिकाणी रेशनिंग दुकानाची खात्री करुन दुकानातील साठा व नोंदवह्यात फेरबदल होऊ नये. तसेच दुकानातील साठ्याची पडताळणी करणे कामी सदर रेशनिंग दुकानाला दोन पंचासमक्ष सिल लावण्यात आले व सर्व संबंधितांचे पंचासमक्ष जबाब नोंदवून घेण्यात आले.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू हा गरजू व पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता, अनधिकृतपणे काळ्याबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ चा भंग केल्यावरुन नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. II ७८/२०११ दि.१५/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | लाल व पांढऱ्या रंगाचा ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ | १ नग | ६,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील १९० गोण्या गव्हाचा साठा (प्रत्येकी ५० किलो वजनाच्या) | ९५०० किलो | १,९०,०००/- |
| | | एकूण | ७,९०,०००/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली

असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०९/११/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक ०९/११/२०११ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करुन सदर सुनावणी दिनांक २९/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे चालक समाधान नामदेव खंडागळे व क्लिनर संतोष विश्वनाथ पवार हे उपस्थित राहिले. तसेच त्यांच्या वतीने ॲड. श्री. राजेश जाधव हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व लेखी निवेदन सादर करण्याकरिता सुनावणीची पुढील तारीख मिळणेस विनंती केली. सदर सुनावणीस अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे व्यवस्थापक योगेश शिंदे हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये तसेच शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था यांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे प्राधिकारपत्रधारक म्हणून त्यांचे लेखी निवेदन स्वतः उपस्थित न राहता, योगेश शिंदे यांचे मार्फत वाचावे क्र. ६ अन्वये सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, पुढील सुनावणी दि.१३/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १३/१२/२०११ रोजीच्या सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, अंतीम सुनावणी दि.२७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २७/१२/२०११ रोजीच्या अंतीम सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे व्यवस्थापक म्हणून योगेश शिंदे यांनी युक्तीवाद केला की, शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे जुईनगर येथे शिधावाटप दुकान आहे, या शिधावाटप दुकानाचा व्यवस्थापक म्हणून त्याची नेमणूक केलेली आहे. सदर नेमणूक झाल्यानंतर त्यांच्या दुकानातील शिधापत्रिकाधारकांना आजपर्यंत नियमितपणे त्यांच्या शिधापत्रिकांवर शासनाचे परिमाणानुसार शिधाजिन्नसांचे वाटप योग्य किंमतीत केलेले आहे. आजपर्यंत सदर संस्थेच्या दुकानाविरुध्द शिधावाटप कार्यालय किंवा इतर ठिकाणी लेखी किंवा तोंडी तक्रार केलेली नाही. दि.१५/१०/२०११ रोजी पहाटे ४ वाजता सहाय्यक पोलिस निरिक्षक यांनी त्याच्या घरी येऊन त्याला नेरुळ पोलिस ठाणे येथे घेऊन गेले. त्यांनी त्यास

सांगितले की, समाधान चौकाजवळ सार्वजनिक शौचालय, से-४, नेरुळ येथे ट्रक जप्त केला. सदर ट्रकमध्ये गहू भरलेला आहे. सदर गहु हा ४१ फ ४३२ ह्या दुकानाचा आहे, असे ट्रक ड्रायव्हर सांगत आहे. सदर प्रकाराबाबत त्याला काहीही माहित नसल्याचे त्यांना त्याने सांगितले. परंतू त्याचे म्हणणे न एकता त्यांनी त्याच्यावर गुन्हा दाखल केला. सदर गव्हाच्या ट्रकशी त्याचा काहीही संबंध नाही. त्याला नाहक या प्रकरणात गोवण्यात आलेले आहे. तरी सदर दुकानातील गहू वाटप शिधापत्रिकाधारकांना केलेला आहे. याबाबत आपण गृहभेटीद्वारे चौकशी करावी व त्याला योग्य न्याय द्यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे अध्यक्ष मिना नरहरी सुतार यांचे दि. २९/११/२०११ रोजीच्या लेखी निवेदनात, शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे जुईनगर येथे शिधावाटप दुकान आहे. त्यांचे शिधावाटप दुकान चालू झाल्यानंतर त्यांच्या दुकानातील शिधापत्रिकाधारकांना आजपर्यंत नियमितपणे त्यांच्या शिधापत्रिकांवर शासनाचे परिमाणानुसार शिधाजिन्नसांचे वाटप योग्य किंमतीत केलेल्या आहेत व आजपर्यंत त्यांच्या संस्थेच्या दुकानाविरुध्द शिधावाटप कार्यालय किंवा इतर ठिकाणी लेखी किंवा तोंडी तक्रार केलेली नाही. दि.१५/१०/२०११ रोजी सहाय्यक पोलिस निरिक्षक यांनी समाधान चौकाजवळील सार्वजनिक शौचालय, से-४, नेरुळ येथे संशयास्पद ट्रक (एमएच-०४-डीएस-१६२७) उभा असलेला आढळला. सदर ट्रकमधील मालाची चौकशी केली असता सदर ट्रकमध्ये ९५०० किलो गव्हाचा साठा आढळला व सदर साठा पोलिसांनी चौकशीसाठी जप्त केला. अधिक चौकशी केली असता ट्रक चालकाने सदर गहू ४१ फ ४३२, जुईनगर येथील असल्याचे सांगितले. त्यामुळे पोलिसांनी त्यांच्या संस्थेचे व्यवस्थापक श्री. योगेश शिंदे यांना चौकशी कामी अटक केली. पोलिसांनी योगेश शिंदे याच्यावर दबाव आणून ९५०० किलो गव्हाचा साठा ४३२ याच दुकानाचा आहे, असे बळजबरीने लेखी जबाब घेऊन त्यावर त्याची स्वाक्षरी घेतली व सदर शिधावाटप दुकान सिल केले. सदरचा गव्हाचा साठा त्यांच्या दुकानाचा नाही. त्याबाबत ते पुढील खुलासा करीत आहेत. त्यांच्या संस्थेच्या दुकानामध्ये माहे सप्टेंबर, २०११ करीता नियतन असलेला गहू देण्यात आलेला नाही. सदर दुकान सप्टेंबर २०११ मध्ये गव्हासाठी कोरडे होते. त्यांच्या संस्थेच्या दुकानामध्ये माहे ऑक्टोबर २०११ मध्ये दि. ०७/१०/२०११ रोजी ३२०० किलो गव्हाची आवक झालेली आहे. त्यांच्या संस्थेचे व्यवस्थापक श्री. योगेश शिंदे दि.०७/१०/२०११ ते १४/१०/२०११ या दरम्यान मलेरियाने आजारी होते. शिधापत्रिकाधारकांची गैरसोय होऊ नये म्हणून त्यांनी दुकानामध्ये महिला सहकाऱ्याची व्यवस्था केली होती. सदर महिला सहकारी नविन असल्यामुळे रोखीची पावती फाडणे त्यांना जमत नव्हते. परंतु दि.०८/१०/२०११ ते १३/१०/२०११ पर्यंत शि.प. धारकांच्या संदर्भ क्रमांकाची नोंद घेऊन त्यांच्या शि.प. वर तशी नोंद घेऊन २६५० किलो गव्हाचे वाटप त्यांनी केलेली आहे. वाशी शिधावाटप कार्यालयाकडून दुकानाची संपूर्ण तपासणी दि.१५/१०/२०११ रोजी दुकानाची सिल उघडून केली असता, दुकानामध्ये ५२५ किलो गव्हाचा साठा आढळून आला. तरी विनंती आहे की, सदर गहू शि.प. धारकांना वाटप केलेला आहे किंवा नाही, ह्याची खातरजमा

RATIONING & ... HEAD OFFICE MUMBAI

करण्यासाठी गृहभेटी देणे गरजेचे आहे. तरी ३२०० किलो गव्हाची आवक असताना ९५०० किलो गहू ह्याच दुकानाचा आहे, असे सदर गुन्ह्यात दाखविले आहे ते चुकीचे आहे. तरी त्यांच्या संस्थेस न्याय मिळावा, असे निवेदनात नमूद केले आहे.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १५/१०/२०११ रोजी नेरुळ पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक श्री. बबन रेवजी इलग तसेच त्यांचे समवेत पोलिस हवालदार श्री. पावरा बक्कल क्र. ८३८ व पोलिस शिपाई श्री. इथापे बक्कल क्र. २४३६ हे गस्त करीत असतांना सुमारे पहाटे ५:२० वाजता त्यांना त्यांचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर यांनी समाधान चौका जवळील सार्वजनिक शौचालय, सेक्टर ४, नेरुळ येथे ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असल्याचे सांगून सदरच्या ट्रकमध्ये योगेश शिंदे यांच्या रेशन दुकानातील गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला आहे, अशी त्यांना बातमीदारामार्फम माहिती मिळालेली असल्याची सांगून सदर ठिकाणी पथकासह येण्यास सांगितले. त्यानुसार सदरचे पथक घटनास्थळी सुमारे पहाटे ५:३५ वाजता पोहचले असता, त्या ठिकाणी वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. चाफेकर व पोलिस हवालदार श्री. नलगे हे हजर होते व त्या ठिकाणी ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा उभा असलेला दिसला. सदरच्या ट्रकमधील मालासंदर्भात पथकाने खात्री केली असता, ट्रकमध्ये गोणीमध्ये गहू भरलेला दिसून आला. त्यासंदर्भात ट्रकमध्ये असलेले चालक नामे समाधान नामदेव खंडागळे तसेच ट्रकमधील दुसरा इसम नामे संतोष विश्वनाथ पवार (क्लिनर) यांचेकडे ट्रकमध्ये असलेल्या गहूबाबत माहिती घेतली असता, ट्रकमधील गहू हा योगेश शिंदे यांच्या रेशनिंग दुकानातील असून तो गहू बाजारात विक्री करण्यासाठी भरलेला असल्याचे उपस्थित दोन्ही इसमांनी सांगितले. त्यावरुन सदर पथकाने रेशनिंग दुकानदाराचा पत्ता विचारला व त्याच्या राहत असलेल्या घरी जाऊन त्यास घटनास्थळी घेऊन आले व सदर ट्रकमधील असलेल्या गव्हाच्या गोण्या संदर्भात विचारणा केली असता, रेशनिंग दुकानदार याने ट्रकमधील एकूण १९० गोणी गहू असल्याचे सांगून सदरचा गहू हा त्याच्या रेशनिंग दुकानातील असून बाजारात विक्रीसाठी त्याने ट्रकमध्ये भरलेला असल्याचे सांगितले. याबाबत पथकाने खात्री केली असता सदरचा साठा हा रेशनिंग दुकानदार योगेश शिंदे हे अनधिकृतपणे बाजारात गहू विक्रीसाठी घेऊन जात असल्याबाबत खात्री झाल्याने सदर रेशनिंग दुकानदार यांना सोबत घेऊन त्यांच्या स्वस्तिक कॉम्पलेक्स येथील रेशनिंग दुकान क्र. ४१ फ/४३२ या ठिकाणी रेशनिंग दुकानाची खात्री करुन दुकानातील साठा व नोंदवह्यात फेरबदल होऊ नये. तसेच दुकानातील साठ्याची पडताळणी करणे कामी सदर रेशनिंग दुकानाला दोन पंचासमक्ष सिल लावण्यात आले व सर्व संबंधितांचे पंचासमक्ष जबाब नोंदवून

घेण्यात आले. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक ट्रक व ५० किलो वजनाच्या १९० गोण्या गव्हाचा साठा (९५०० किलो) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

शिवाई महिला औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेचे अध्यक्षा मिना नरहरी सुतार या संस्थेच्या वतीने प्राधिकारपत्रधारक म्हणून स्वत: उपस्थित न राहता, त्यांनी नमूद गुन्ह्यातील आरोपी योगेश शिंदे यांचे मार्फत लेखी निवेदन सादर करुन योगेश शिंदे यांना संस्थेचे व्यवस्थापक म्हणून नेमल्याचे नमूद केले असून त्याबाबतचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केलेले नाही. ट्रक क्र.एमएच-०४-डीएस-१६२७ मध्ये घटनास्थळी जप्त करण्यात आलेला नियंत्रित दराचा गव्हाचा साठा त्यांच्या संस्थेच्या नावे असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ या दुकानाचा नसल्याचे नमूद केले आहे. तथापी, योगेश शिंदे हे नमूद गुन्ह्यातील आरोपी असून त्याने घटनास्थळी दिलेल्या जबाबात, त्याच्या ताब्यात असलेले अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चा तो व्यवस्थापक असून मागिल ७ महिन्यांपासून दुकान चालवित असल्याचे सांगितले. दि.१४/१०/२०११ रोजी त्याच्या ताब्यात असलेले नमूद रेशनिंग दुकानातील १९० पोती गव्हाचा साठा प्रत्येकी ५० किलो वजनाचे असा एकूण ९५०० किलो गहू खुलाबाजारात विक्री करण्यासाठी त्याच्या ओळखीच्या संतोष विश्वनाथ पवार यास ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ या ट्रकमध्ये भरुन दिला व जप्त करण्यात आलेला संपूर्ण गव्हाचा साठा हा त्याच्या नमूद रेशनिंग दुकानातील असल्याचे कबूल केले आहे. ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे चालक समाधान नामदेव खंडागळे व क्लिनर संतोष विश्वनाथ पवार यांनीही घटनास्थळी दिलेल्या जबाबात सदर गव्हाचा साठा रेशनिंग दुकानदार योगेश शिंदे याच्या सांगण्यावरुन अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ या दुकानातून भरला असल्याचे कबूल केले आहे. यावरुन सर्व संबंधितांनी अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ या दुकानामधील शासनाने शिधापत्रिकेवरील शिधापत्रिकाधारकांना वाटप करण्यासाठी अनुदानित दराने उपलब्ध करुन दिलेल्या गव्हाच्या साठ्यापैकी १९० पोती गव्हाचा साठा प्रत्येकी ५० किलो वजनाचे असा एकूण ९५०० किलो गहू पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत न करता बेकायदेशीररित्या खुल्याबाजारात विक्री करण्यासाठी परस्पर संगणमत करुन काळाबाजार व जादा नफेखोरीच्या उद्देशाने विक्री व वाहतूक केली असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७४/२०११/जा.८७०, दिनांक ०१/११/२०११ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे चालक समाधान नामदेव खंडागळे व क्लिनर संतोष विश्वनाथ पवार यांनी घटनास्थळी दिलेल्या जबाबात, त्यांनी त्यांच्या ओळखीचे रेशनिंग दुकानदार योगेश शिंदे यांनी सदरचा ट्रक कोल्हापूर येथे घेऊन जाण्यासाठी रुपये १०,०००/- भाडे ठरवून त्यांच्या जुई नगर, सेक्टर नं. २५ येथील रेशनिंग दुकानातून १९० पोती गहू नमूद ट्रकमध्ये भरला व सदर गहू बाजारात विंक्री करण्यासाठी घेऊन जात असताना पोलिसांनी पकडला असल्याचे कबूल केले आहे. तसेच दिनांक २९/११/२०११ रोजीच्या सुनावणीस ट्रक क्र. एमएच-

०४-डीएस-१६२७ चे चालक समाधान नामदेव खंडागळे व क्लिनर संतोष विश्वनाथ पवार हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. तथापी, त्यापुढील सुनावणीस ते हजर राहिले नाहीत व जप्त ट्रकच्या मालकास सुनावणीस पाचारण करुन सुध्दा तेही उपस्थित राहिले नाहीत. तसेच सदर ट्रकच्या मालकीबाबत कोणीही दावा केलेला नाही. त्यामुळे त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. यावरुन ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे मालक, चालक व क्लिनर यांनी योगेश शिंदे याच्याशी संगणमत करुन सदरचा जप्त गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा तो गैरमार्गाने विक्री करण्यासाठी ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चा वापर अवैध वाहतूकीसाठी केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे मालक यांच्या अपरोक्ष जरी चालकानी त्यांचे वाहनाचा गैरवापर केला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यांनी त्यांचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. II ७८/२०११ दि.१५/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) या कार्यालयाचे दि.०१/११/२०११ रोजीचे अंतरिम आदेश या आदेशान्वये कायम करण्यात येत आहेत.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे चालक, समाधान नामदेव खंडागळे
२) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे क्लिनर, संतोष विश्वनाथ पवार
३) ट्रक क्र. एमएच-०४-डीएस-१६२७ चे मालक
४) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे दुकानदार, योगेश शिंदे
५) अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ४१ फ/४३२ चे प्राधिकारपत्रधारक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नेरुळ पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दुकान शाखा, का.क्र. १०, प्रधान कार्यालय यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.